Government of Maharashtra

MAGNETIC MAHARASHTRA

CONVERGENCE 2018

Global Investors Summit - Feb 18-20

# महाराष्ट्र औद्योगिक धोरण–2013 सोबतच्या ''अनुसूची –अ'' येथे दर्शविलेल्या ''एकात्मिक औद्योगिक क्षेत्र'' विकसित करण्यासंबंधी धोरणामध्ये सुधारणा करण्याबाबत.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उद्योग विभाग

# महाराष्ट्र औद्योगिक धोरण–2013 सोबतच्या ''अनुसूची –अ'' येथे दर्शविलेल्या ''एकात्मिक औद्योगिक क्षेत्र'' विकसित करण्यासंबंधी धोरणामध्ये सुधारणा करण्याबाबत.

**प्रस्तावना:–**

केंद्र सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, 2005 व विशेष आर्थिक क्षेत्र नियम, 2006 लागू केले असून, त्या अंतर्गत काही विशेष आर्थिक क्षेत्रे अधिसूचित केलेली आहेत. बाजारपेठेमध्ये असलेली प्रतिकूल परिस्थिती तसेच अशा विशेष आर्थिक क्षेत्रांसाठी विविध करांमध्ये कमी करण्यात आलेल्या प्रोत्साहनात्मक बाबीमुळे महाराष्ट्र राज्यात मंजूर करण्यात आलेले/अधिसूचित करण्यात आलेली विशेष आर्थिक क्षेत्र अधिसूचना रद्द अथवा मागे घेण्यात आली आहेत. भविष्यात आणखी काही विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्ताव अधिसूचना रद्द अथवा मागे घेण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीमध्ये राज्य शासन अशा निर्णयाप्रत आले आहे की, या भागांचा नियोजनबद्ध विकास आणि औद्योगिकरणास चालना देण्यासाठी एक योग्य असे निर्गमन धोरण (Exit Policy) तयार करणे आवश्यक होते.

ही बाब विचारात घेऊन अधिसूचना रद्द केलेल्या/प्रस्ताव मागे घेण्यात आलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांच्या जमीनीचा वापर कसा करता येईल याबाबतच्या धोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. आयआयपॉलिसी–2010/प्र.क्र.768/2010/उद्योग–2, दि. 20.7.2012 नुसार संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. समितीने सर्व संबंधितांशी सखोल चर्चा करुन तसेच समितीच्या बैठकांमध्ये विविध विषयांवर अभ्यास करुन उक्त विषयासंबंधीचा अहवाल शासनास दिनांक 23.11.2012 रोजी सादर केला आहे. या समितीच्या शिफारशी तपासून घेतल्यानंतर सदर अहवाल काही बदलांसह स्वीकारला आहे. अंतिमत: एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासंबधी धोरण स्वीकारण्यात आले होते.

औद्योगिकरणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या क्षेत्राचा वापर व त्यावरील परतावा हा जागतिक व्यापारातील चढ/उतारावर तसेच तेजी/मंदीवर अवलंबून असतो. शिवाय उत्पादन प्रक्रियेत जमिनीचे मूल्य एका विशिष्ट रकमेपेक्षा जास्त वाढविता येत नाही. त्यामुळे रहिवासी व वाणिज्यीक आवारांच्या निर्मितीतून विकासक आर्थिक समतोल साधू शकतो. संयुक्त उपक्रम विशेष आर्थिक क्षेत्रावर एकात्मिक्क औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी, त्यांना प्राप्त होणाऱ्या 'औद्योगिक वापरासाठी' 60 टक्के व पूरक बाबींच्या वापरासाठी 40 टक्के या जमिनीच्या वापरामधील प्रमाणात बदल करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमित औद्योगिक वसाहतीप्रमाणे अनुज्ञेय असलेला 80:20 असा जमिनीचा वापर निश्चित करण्यात यावा. तसेच महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण–2013 सोबतचे अनुसची–अ येथे नमूद केलेल्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासंबंधी धोरणामध्ये पात्रतेसंदर्भात काही निकष निश्चित केले आहेत. त्यापैकी सदर धोरण संबंधित विशेष नियोजन प्राधिकाऱ्याच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 37 (1अअ) नुसार जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याच्या तारखेपर्यंत (नियत दिनांक) तसेच वरील वर्गवारीतील जे विशेष आर्थिक क्षेत्र सदर नियत दिनांकानंतर 6 महिन्यांच्या आत ना– अधिसूचीत किंवा औपचारिक मंजूरीनंतर मागे घेण्यात येतील अशी क्षेत्रे ''एकात्मिक औद्योगिक क्षेत्रे'' म्हणून विकसीत करण्यास पात्र राहतील. या तरतूदीमुळे काही विशेष आर्थिक क्षेत्र ना–अधिसूचीत होऊन/औपचारीक मंजूरी नंतर मागे घेऊन, देखील नियत दिनांकापर्यंत उक्त कार्यवाही न झाल्याने ते अपात्र ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर धोरण अस्तित्त्वात आणण्यामागील अंतस्थ हेतू साध्य होत नसल्याने उक्त ''नियत दिनांक'' संबंधीत पात्रतेच्या निकष पूर्णत: काढून टाकण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Government of Maharashtra

## शासन निर्णय :

राज्य शासन अथवा शासनाचे उपक्रम/महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/सिडको यांचेकडील जमीनीवर स्थापित विशेष आर्थिक क्षेत्रावर एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासंदर्भात शासनाकडून नव्याने पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

1. राज्य शासन अथवा शासनाचे उपक्रम/म.औ.वि.म./सिडको यांचेकडील जमीनीवर स्थापित विशेष आर्थिक क्षेत्रावर एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करावयाचे झाल्यास, 'औद्योगिक वापरासाठी' 60 टक्के व पूरक बाबींच्या वापरासाठी 40 टक्के या जमिनीच्या वापर अनुज्ञेय होता. या जमिनीच्या वापराच्या प्रमाणात बदल करुन अशा क्षेत्रावरील एकात्मिक औद्योगिक क्षेत्राच्या विकासनासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय असलेला किमान 80 टक्के औद्योगिक वापरासाठी व कमाल 20 टक्के वापर पूरक बाबींसाठी असा जमिनीचा वापर निश्चित करण्यात येत आहे.

2. महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण 2013 सोबतचे ''अनुसची- अ'' येथे नमूद केलेल्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासंबंधी धोरणामध्ये पात्रतेसंदर्भांत काही निकष निश्चित केले आहेत.

   त्यापैकी सदर धोरण संबंधित विशेष नियोजन प्राधिकाऱ्याच्या विकास नियमावलीमध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 37 (1अअ) नुसार जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याच्या तारखेपर्यंत (नियत दिनांक) तसेच वरील वर्गवारीतील जे विशेष आर्थिक क्षेत्र सदर नियत दिनांकानंतर 6 महिन्यांच्या आत ना-अधिसूचीत किंवा औपचारिक मंजूरीनंतर मागे घेण्यात येतील अशी क्षेत्रे ''एकात्मिक औद्योगिक क्षेत्रे'' म्हणून विकसीत करण्यास पात्र राहतील.

   उपरोक्त तरतूदीमुळे काही विशेष आर्थिक क्षेत्र ना-अधिसूचीत होऊन/औपचारीक मंजूरी नंतर मागे घेऊन देखील नियत दिनांकापर्यंत उक्त कार्यवाही न झाल्याने ते अपात्र ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर धोरण अस्तित्त्वात आणण्यामागील अंतस्थ हेतू साध्य होत नसल्याने उक्त ''नियत दिनांक'' संबंधीत निकष पूर्णत: काढून टाकण्यात येत आहेत.

3. खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (KEIPL) यांचेकडून प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची कंपनी खेड डेव्हलपर्स लि. (KDL) यांना हस्तांतरीत होणाऱ्या 15% विकसित भूखंडाच्या क्षेत्रासाठी आकारल्या जाणाऱ्या मुद्रांक शुल्काच्या रकमेस मुंबई मुद्रांक अधिनियम कलम (9) नुसार लोकहितास्तव माफी देण्यात येत आहे.

4. खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (KEIPL) या कंपनीस विना-अधिसूचित झालेल्या क्षेत्रामध्ये एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (II) स्थापित करण्यासाठी तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र संदर्भात मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील नियुक्त उच्चाधिकार समिती खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (KEIPL) च्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्रा संदर्भात देखील पुढील कार्यपध्दती निश्चित करेल.

Government of Maharashtra

**DEPARTMENT OF INDUSTRIES, ENERGY AND LABOR**

Government of Maharashtra,
Mantralaya, Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22025393
**Website: https://www.maharashtra.gov.in/**

**DIRECTORATE OF INDUSTRIES**

Government of Maharashtra,
New Administrative Building,
2nd floor, Opp. Mantralaya,
Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22023584/22028616
**Website: https://di.maharashtra.gov.in/**

**MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION (MIDC)**

Udyog Sarathi, Mahakali Caves Road,
Andheri East, Mumbai, Maharashtra 400093
Tel.: (91-22) 26870800
**Website: https://www.midcindia.org/**

**MAHARASHTRA INDUSTRY, TRADE AND INVESTMENT FACILITATION CELL (MAITRI)**

"Krupanidhi" Building, 9,
Walchand Hirachand Marg,
Ballard Estate, Mumbai – 400001
Tel.: (91-22) 22622362
**Email id: maitri-mh@gov.in**
**Website: https://maitri.mahaonline.gov.in/**